४ लोकमत
पुणे, गुरुवार, दि. १२ मे २०१६

# शुभम काजळे ठरला युवा आयर्नमॅन



**पुणे :** ऑस्ट्रेलियात झालेल्या आयर्नमॅन स्पर्धेत नदीमध्ये ४ किमी पोहणे, १८० किमी सायकलिंग व ४२ किलोमीटर अंतर धावण्याच्या शर्यतीत पुण्याच्या नवी पेठेतील शुभम काजळे बाजी मारत युवा आयर्नमॅन किताबावर मोहोर उमटविली. जगभरातून आलेल्या २ हजार स्पर्धकांशी झुंज देत त्याने ही कामगिरी केली आहे.

ऑस्ट्रेलियामध्ये मे महिन्यात दरवर्षी ही स्पर्धा आयोजिली जाते. त्यात देशातील चेन्नई व पुणे येथील दोनच स्पर्धक सहभागी झाले होते. आयर्नमॅन ऑस्ट्रेलिया ही स्पर्धा सलग १७ तासांत पूर्ण करणे बंधनकारक असते. मात्र शुभमने धावणे, पोहणे व सायकलिंग असे तिन्ही प्रकार १४ तास १७ मिनिटांमध्ये पूर्ण केली. जगभरातील २ हजार स्पर्धकांपैकी सुमारे १ हजार ५०० स्पर्धक ही स्पर्धा पूर्ण करण्यात यशस्वी ठरले. त्यात शुभमने सर्वांत कमी वयात ही स्पर्धा यशस्वी पार केली.

यापूर्वी शुभमने चेन्नई हाफ आयर्न ट्रायथलॉन, गोवा ट्रायथलॉन, म्हैसूर हाफ ट्रायथलॉन यांसारख्या स्पर्धांमध्ये सहभागी झाला होता. तो टिळक तलावावर प्रशिक्षक कल्पना आगाशे व दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्सरायडिंग ॲकॅडमीचे गुणेश पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. नवी पेठेतील रामबाग कॉलनीमध्ये राहत असलेल्या शुभमने नुकतीच १२ वी कॉमर्सची परीक्षा दिली असून तो स. प. महाविद्यालयात शिकत आहे.

स्पर्धेचा अनुभव सांगताना शुभम म्हणाला, की स्पर्धेदरम्यान आलेल्या अडचणींकडे संधी म्हणूनच पाहिल्यामुळे त्यावर मी सहज मात करु शकलो. या स्पर्धेकरिता माझी दोन वर्षांपासून तयारी सुरु होती. त्यामध्ये मी दररोज ४ ते ५ तास सायकलिंग, पोहणे आणि २ ते ३ तास धावण्याचा सराव केला. यापुढेही अशा अनेक स्पर्धांमध्ये भाग घेऊन विजयी व्हायचे असल्याचे त्याने सांगितले. शुभमने मिळविलेल्या या यशाबद्दल पुण्यातील दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्सरायडिंग ॲकॅडमीतर्फे त्याचा सन्मान करण्यात आला. नारायण पेठेतील गुप्ते मंगल कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाला शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, आकाश कोरगावकर, आनंद सराफ, ॲकॅडमीचे गुणेश पुरंदरे, शुभमचे आजोबा वसंत काजळे, वडील संजय काजळे उपस्थित होते. (क्रीडा प्रतिनिधी)